| | |
|---|---|
| MHMM130025652021 | **फौ.ख.क्र. ९०६/पी.एस./२०२१**<br>**सरकार तर्फे ॲन्टॉप हिल पोलीस ठाणे**<br>**वि. रोहित उर्फ पप्पी मूलचंद चौहाण,**<br>**निशाणी क्र.०३ खाली** |

## न्यायनिर्णय

(पारित दिनांक ०७.०८.२०२६)

१. विद्वान सहाय्यक सरकारी अभियोक्ता श्री. बाळासाहेब मिसाळ व आरोपीचे विद्वान वकील सहाय्यक न्यायरक्षक श्री. तुषार माळवी यांचा युक्तीवाद ऐकला. त्याप्रमाणे माझ्यासमक्ष विचाराधीन प्रश्न आणि निष्कर्ष कारणमिमांसासह खालीलप्रमाणे आहेः

| अ.क्र. | विचाराधीन प्रश्न | निष्कर्ष |
|---|---|---|
| १. | आरोपी हा तडीपार असून त्याने विनापरवानगी ॲन्टॉप हिल पोलीस स्टेशनच्या हद्दीत प्रवेश करून मा. पोलीस उप आयुक्त, बृहन्मुंबई, परिमंडळ–४, मुंबई यांचे दि.२८.०९.२०२० रोजीच्या आदेशाचे उल्लंघन केले, असे अभियोग पक्षाने सिध्द केले आहे काय? | नाही. |
| २. | कोणताही गुन्हा सिद्ध झाला काय? | नाही. |
| ३. | आदेश काय? | आरोपीला निर्दोष मुक्त केले. |

## कारणमिमांसा

२. आरोपीवर ठेवण्यात आलेले आरोप शाबित करण्यासाठी अभियोग पक्षातर्फे फिर्यादी अ.सा.क्र.१ सुर्यकांत सदाशिव आंग्रे व अ.सा.क्र.२ एकनाथ चंद्रकांत पाउलबुध्दे यांना तपासण्यात आले आहे. याविरुद्ध आरोपीने स्वतःचे बचावकामी कोणतेही साक्षीदार तपासले नाहीत.

<u>विचाराधीन प्रश्न क्र. १ ते ३ करिता</u> :

३. अ.सा.क्र.१ आंग्रे यांच्या पुराव्यात असे आले आहे कि, दि.२३.०१.२०२१ रोजी ते दिवसपाळी कर्तव्यावर सकाळी ९.०० वा. पासून हजर असताना त्यांना रेकार्डवरील आरोपी रोहित मूलचंद चव्हाण उर्फ पप्पी हा सध्या तडीपार असूनही तो संध्याकाळी ०६.१५ ते ०६.३० च्या दरम्यान एस.एम. रोड, ॲन्टॉप हिल पोस्ट ऑफीससमोर, साईनाथ रहिवाशी संघ, रूम नं.७ येथे त्याच्या सहकारीला भेटायला येणार आहे अशी माहिती प्राप्त झाली. म्हणून ते त्यांच्या कार्यालयातून १७.५० वा. निघाले आणि साधारणत: १८.१५ वा. चे दरम्यान घटनास्थळी पोहोचले. संध्याकाळी ०६.१५ ते ०६.३० वा. चे दरम्यान बातमीदाराने दिलेल्या बातमीप्रमाणे त्यांना आरोपी रोहित उर्फ पप्पी खाली येताना दिसला. तेव्हा सर्व पोलीसांनी आरोपीचा अटकाव केला. त्यांनी आरोपीला त्याचे नाव विचारले असता त्याने त्याचे नाव रोहित उर्फ पप्पी मूलचंद चव्हाण, वय वर्षे ३० असे सांगितले. सदरील आरोपीला दि.२८.०९.२०२० रोजी च्या आदेश क्र.६६/सी/४३/२०२० अन्वये आरोपी पुढील सहा महिन्याकरिता मुंबई जिल्हयाच्या हद्दीतून तडीपार असल्याचे सांगितले. आरोपीच्या अंगझडती मध्ये काही मिळून आले नाही. त्यानंतर त्यांनी आरोपीला ताब्यात घेवून ॲन्टॉप हिल पोलीस स्टेशनला आणले आणि सदर घटनेसंदर्भात कायदेशीर फिर्याद (नि.क्र.०७) दिली. त्याआधारे एफ.आय.आर. (नि.क्र.०८) नोंदविण्यात आली.

४. अ.सा.क्र.२ पाऊलबुध्दे यांनी त्यांच्या पुराव्यात असे कथन केले आहे कि, दि.२४.०१.२०२१ रोजी ते दिवसपाळी कर्तव्यावर हजर असताना ॲन्टॉप हिलला असलेल्या गुन्हे शाखा, युनिट ४ मध्ये पोलीस हवालदार सुर्यकांत आंग्रे यांनी समक्ष पोलीस स्टेशनला येवून माहिती दिली कि, ॲन्टॉप हिल पोलीस स्टेशन येथून हद्दपार करण्यात आलेले इसम रोहित उर्फ पप्पी मूलचंद चौहाण हा कोणत्याही परवानगीशिवाय ॲन्टॉप हिल पोलीस स्टेशनच्या हद्दीत मिळून आला. या आरोपीवर जवळपास ६ ते ७ दखलपात्र गुन्हे दाखल आहेत. त्यातील सन २०१२ च्या गुन्हयामध्ये त्याला दोषसिद्धी होवून शिक्षा लागलेली आहे.

त्याला ५ वर्षाची सक्तमजुरी आणि काही रोख रक्कम या स्वरूपाची शिक्षा झालेली आहे. नमूद आरोपीला मा. पोलीस उपायुक्त, मंडळ ३ यांनी सहा महिन्यांकरीता मुंबई शहर व मुंबई उपनगर च्या हद्दीतून तडीपार केले होते. नमूद आदेशाचा कालावधी सुरू असताना सदर आरोपी हा कोणत्याही परवानगीशिवाय त्याच्या राहत्या घराच्या परिसरात मिळून आला. त्यांनी हद्दपार आदेशाची सत्यप्रत (नि.क्र.१०) मधील मजकूर खरा व बरोबर असल्याचे कथन केले. त्यानंतर त्यांनी आरोपीला अटक केली व त्याचा पंचनामा (नि.क्र.११) तयार केला. त्यानंतर त्यांनी साक्षीदारांचे जबाब नोंदविले व आरोपीविरूद्ध सबळ पुरावा आढळलयाने त्याच्याविरूद्ध दोषारोपपत्र दाखल केले.

५. प्रस्तुत प्रकरणात गुन्हा सिद्ध करण्याकरीता अभियोग पक्षाने आरोपीने मा. पोलीस उप आयुक्त, परिमंडळ–४, मुंबई यांचे हद्दपार आदेश क्र. ६६/सी/४३/२०१०, दि.२८.०९.२०२० यांचे उल्लंघन केल्याचे सिद्ध केले पाहिजे. अभियोग पक्षाने मा. पोलीस उप आयुक्त, बृहन्मुंबई, परिमंडळ–४, मुंबई यांच्या प्रतिबंधात्मक आदेशाची खरी नक्कल अभिलेखावर दाखल केली आहे. परंतु, सदरचे हद्दपार आदेशाची आरोपीवर बजावणी केल्याबाबतचा किंवा सदरील आदेशावर आरोपीची सही व अंगठयाचा ठसा असल्याबाबत कोणताही पुरावा अभियोग पक्षाने सादर केलेला नाही. करिता, घटनेच्या वेळी आरोपीला सदरील आदेशाची माहिती होती व त्याने जाणुनबुजून सदरील आदेशाचे उल्लंघन केल्याची बाब सिद्ध होत नाही. करिता, अभियोग पक्षाने जरी हद्दपारीचा आदेश सिद्ध केला असला तरी त्याची आरोपीवर झालेली बजावणी सिद्ध करण्यासाठी अभियोग पक्ष असफल ठरला.

६. अशा प्रकरणामध्ये स्वतंत्र साक्षीदाराची साक्ष महत्वाची असते. परंतु, अभियोग पक्षाने तपासी अधिकारी यांच्या कथनास दुजोरा देण्यासाठी एकही स्वतंत्र साक्षीदार तपासला नाही. त्यामुळे अभियोग पक्षाचे कथन कमकुवत ठरते. तसेच, या प्रकरणामध्ये घटनास्थळ पंचनामा करण्यात आला नाही. त्यामुळे घटनास्थळ स्पष्ट झालेले नाही. सबब,अभियोग पक्षाचे

एकंदरीत पुराव्याचे साकल्याने अवलोकन केले असता आरोपीने तथाकथित गुन्हा केल्याचे निःसंशय शाबीत होत नाही. करिता, विचाराधीन प्रश्न क्र. १ व २ चे निष्कर्ष नकारार्थी नोंदविण्यात येत असून विचाराधीन प्रश्न क्र.३ च्या उत्तरार्थ खालीलप्रमाणे अंतिम आदेश पारीत करण्यात येत आहेः

## आदेश

**१.** आरोपी **रोहित उर्फ पप्पी मूलचंद चौहाण** यास कलम १४२ महाराष्ट्र पोलीस अधिनियम, १९५१ अंतर्गत गुन्ह्यातून फौजदारी प्रक्रिया संहितेच्या कलम २५५(१) अन्वये निर्दोष मुक्त करण्यात येत आहे.

**२.** आरोपीचे जुने जामीन बंधपत्र रद्द करण्यात येत आहे.

**३.** आरोपीने कलम ४३७(अ) संहिता, १९७३ अन्वये रु.१५,०००/-(रुपये पंधरा हजार फक्त) चे जामीन बंधपत्र न्यायनिर्णयाच्या तारखेपासुन १५ दिवसाच्या आत दाखल करावे.

(न्यायनिर्णय खुल्या न्यायालयात घोषित करण्यात आला.)

AKSHI JAIN
Digitally signed by AKSHI JAIN
Date: 2026.08.07 17:44:30 +0530

(कु. अक्षी जैन)
प्रथम वर्ग न्यायदंडाधिकारी,
६१ वे न्यायालय, कुर्ला, मुंबई.

दि. ०७/०८/२०२६

Directly dictated on :- 07/08/2026
Checked and signed on :- 07/08/2026